# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.06.2026** **वारःरविवार**

---

- नैऋत्य मोसमी पाऊस तळकोकणात दाखल
- पूर्वमोसमी वादळी पावसामुळं 24 जिल्ह्यात 1 लाख एकरपेक्षा जास्त शेतीचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज
- सुधारित महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम डिसेंबरच्या अधिवेशनात मांडला जाणार आणि
- 18 वर्षांखालील मुलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघ तिसऱ्यांदा विजेता

**नैऋत्य-मोसमी-पाऊस**

नैऋत्य मोसमी पावसाचं काल महाराष्ट्रात आगमन झालं असून तळकोकणात मोसमी पाऊस दाखल झाल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. साधारणपणे 20 जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात नैऋत्य मोसमी पाऊस सक्रिय होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

गेल्या वर्षी नैऋत्य मोसमी पावसानं 25 मे रोजी राज्यात प्रवेश केला होता. यंदा मोसमी पावसाची वाटचाल वेगानं सुरू असून दक्षिण भारतातील संपूर्ण केरळ आणि तामिळनाडू, कर्नाटकचा अर्ध्याहून अधिक भाग तसंच आंध्र प्रदेशच्या दक्षिणेकडील प्रदेश व्यापल्यानंतर त्यानं महाराष्ट्रात प्रवेश केला आहे.

**पूर्वमोसमी**

राज्यात पूर्वमोसमी वादळी पावसामुळं 24 जिल्ह्यात अंदाजे 1 लाख 500 एकरावरील शेतीचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. बाधित क्षेत्राचे तत्काळ पंचनामे करण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश देण्यात असून याबाबतचा अहवाल प्राप्त होताच तातडीनं मदत करण्यात येईल, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. भरणे यांनी काल पुणे जिल्ह्याच्या इंदापूर तालुक्यातील नुकसानाबाबत पाहणी करुन शेतकऱ्यांना धीर दिला.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही बारामती तालुक्यातील नुकसानग्रस्त केळी पिकाची पाहणी करुन शेतकऱ्यांशी साधला संवाद साधला आणि लवकरात लवकर मदतीचं आश्वासन दिलं.

**नाशिक**

'नाफेड' आणि 'एनसीसीएफ'मार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या कांद्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात 72 तासांच्या आत जमा करावेत, तसंच उद्यापासून नाशिक जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये कांदा खरेदी प्रक्रिया सुरू करावी, असे निर्देश काल नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत देण्यात आले.

**बावनकुळे**

महाराष्ट्रातील देवस्थानांच्या हक्कांचं संरक्षण आणि त्यांच्या मालकीच्या जमिनींवरील अतिक्रमणं दूर करण्यासाठी नियोजित 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियमाच्या वर्तमान प्रारूपाला स्थगिती देऊन, सुधारित प्रारूप करण्यासाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपूर इथं केली.

नागरिक आणि देवस्थानांना या सुधारित प्रारूपावर 15 सप्टेंबरपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात आपल्या हरकती नोंदवता येतील. त्यानंतर, आगामी डिसेंबर महिन्यातील विधिमंडळ अधिवेशनात अंतिम कायदा मंजुरीसाठी आणला जाईल, असं सांगताना ते म्हणाले....

**देवस्थानला साडेपाच लाख हेक्टर जमीन त्या ठिकाणी मिळाव्यात आणि कुळ कायद्याचंही संरक्षण व्हावं.. ज्या कुळाने केलेल्यात त्या कुळाने द्याव्यात अशा वेगवेगळ्या स्वरूपाचा एक कायदा महाराष्ट्र सरकारने आणण्याचा विचार केला होता आणि एक महिना काल पाच जून पर्यंत यावर देवस्थान समितीचे आक्षेप मागितले होते. मला आनंद आहे की महाराष्ट्राच्या सर्व देवस्थानांनी यामध्ये भाग घेतला. त्यांनी आपापले आक्षेप या सरकारकडे पाठवले आता आम्ही विचार करतो आहे की आक्षेप फार मोठ्या प्रमाणावर आहे म्हणून जो प्रारूप आम्ही जाहीर केलेला आहे ते सध्या स्थगित करतो आहे आणि राज्यामध्ये आमचे ACS महसूल श्री विकास कारगे यांच्या अध्यक्षतेखाली दोन विभागीय आयुक्त, दोन कलेक्टर तीन उपसचिव आणि पंधरा देवस्थानचे प्रतिनिधी यांची एक समिती तयार करून हा जो कायदा आला आहे हे जे आक्षेप आले आहेत या सर्व आक्षेपांची सुनावणी घेऊन नवीन कायदा आम्ही या राज्यामध्ये आणण्याचा प्रयत्न करतो आहे.**

**आढावा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल 'पंतप्रधान-आर्थिक सल्लागार परिषदे'च्या सदस्यांसोबत बैठक घेऊन जागतिक अस्थिरतेच्या काळात भारताच्या आर्थिक विकासाला अधिक चालना देण्यासाठी विविध उपाययोजना आणि कल्पनांवर चर्चा केली. तसंच, 'जीवन सुलभता' आणि 'व्यवसाय सुलभता' सुधारण्यासाठी आवश्यक विविध सुधारणांवरही चर्चा करण्यात आली. पश्चिम आशियातील संघर्षाचा भारत आणि जगावर होणाऱ्या परिणामांबाबतही सदस्यांनी आपलं विश्लेषण सादर केलं.

**राज्यपाल**

तरुण पिढीमध्ये बदलत्या जागतिक परिस्थितीत नेतृत्त्व, नवप्रवर्तक, उद्योजक आणि राष्ट्रनिर्माते आदी भूमिका बजावण्याची प्रचंड क्षमता आहे. ही क्षमता प्रत्यक्षात आणण्यासाठी विद्यापीठे, उद्योग आणि नवोद्योजकांना साथ, प्रोत्साहन देतील अशा संस्थांमध्ये अधिक भागीदारी होण्याची गरज आहे, असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी काल पुण्यात केलं.

पुणे इंटरनॅशनल सेंटरमध्ये शक्ती समिट-2026 कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य आणि लष्कराच्या दक्षिण कमांडाचे माजी जनरल ऑफिसर कमांडिंग इन चीफ लेफ्टनंट जनरल अजय कुमार सिंग यांच्यासह फोरमचे सदस्य, नवउद्योजक, उद्योजक, गुंतवणूकदार, व्यावसायिक आदी उपस्थित होते.

**हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे...**

**<u>शिवराज्याभिषेकदिन</u>**

राज्यात सर्वत्र शिवराज्याभिषेक दिन काल उत्साहात साजरा करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील किल्ले रायगडावर 353 वा शिवराज्याभिषेक सोहळा युवराज संभाजीराजे छत्रपती आणि शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी हजारो शिवभक्त उपस्थित होते. राजसदरेवर महाराजांच्या उत्सव मूर्तीस विधिवत अभिषेक केल्यानंतर, सिंहासनारूढ शिवपुतळ्यावर सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला.

इतर जिल्ह्यातही शिवराज्याभिषेक दिनानिमित्त काल विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>मुख्यमंत्री</u>**

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि बा पाटील यांचं नाव देण्याबाबत कारवाई पूर्ण झाली असून केंद्र सरकारकडं पाठपुरावा करुन हे नामकरण करुन घेऊ असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी मुंबईत दिलं. नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचं अनावरण केल्यानंतर ते बोलत होते. छत्रपतींच्या पुतळ्याचं अनावरण करताना मुख्यमंत्री म्हणाले...

**आजचा दिवस हा स्वराज्याला छत्रपती मिळाले तो दिवस आहे आणि ज्या दिवशी संपूर्ण जगाने हिंदवी स्वराज्य मान्य केलं तो आजचा दिवस आहे. आणि मला अतिशय आनंद आहे की अशा या पवित्र दिवशी छत्रपती शिवरायांचा वीस फुटी ब्रांझचा पुतळा त्याचं अनावरण नवी मुंबईच्या विमानतळावर झालेलं आहे आणि मला विश्वास आहे या आंतरराष्ट्रीय विमानतळावर येणारा आणि जाणारा प्रत्येक प्रवासी हा महाराजांच्या या प्रतिमेतून महाराजांच्या पुतळ्यातून महाराजांच्या स्मारकातून त्या ठिकाणी ऊर्जा प्राप्त करेल.**

**<u>मुख्य-सचिव</u>**

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी काल विशेष सर्वेक्षण आणि सेवा समृद्धी मोहिमेंतर्गत निवड करण्यात आलेल्या गडचिरोली जिल्ह्याच्या कुरखेडा तालुक्यातील गुरनोली गावाला भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी गावकऱ्यांनी धान खरेदीचे थकीत चुकारे, शेतीसाठी सिंचन सुविधा, धान आणि मक्याला वाढीव हमीभाव, गोदाम उभारणी, हत्तींच्या उपद्रवामुळं होणारे नुकसान, शेतीपंपांसाठी अपुरा वीजपुरवठा, नदीवरील बंधारा, तलावांचं पुनरुज्जीवन यांसारख्या प्रश्नांकडं मुख्य सचिवांचं लक्ष वेधलं.

**<u>FFFS</u>**

कोल्हापूर जिल्ह्यात क्यूआर कोडद्वारे अनुदानित खत वितरणास प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. राज्यातील केवळ कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे. योजनेच्या पहिल्याच दिवशी, 5 जूनला, कोल्हापूर जिल्ह्यात 1 हजार 319 खत बुकिंगसाठी क्यूआर कोड निर्माण करण्यात आले. काल प्रत्यक्ष खत वितरण प्रक्रिया सुरू करण्यात आली. या डिजिटल प्रणालीमुळं शेतकऱ्यांना खतासाठी रांगेत उभं राहण्याची गरज राहणार नाही.

**कोल्हापूर-बेळगाव-रेल्वेमार्ग**

कोल्हापूर-बेळगाव रेल्वेमार्गाचं ड्रोन सर्वेक्षण सुरू झालं आहे. मुंबई-बंगळूरु महामार्गाला लागूनच हा समांतर पर्यायी रेल्वे मार्ग तयार करण्याची तयारी केंद्रीय रेल्वे प्रशासनाकडून केली जात आहे. बेळगाव-कोल्हापूर रेल्वे सुरू करण्याची मागणी गेल्या दहा वर्षापासून प्रलंबित होती.

**अहिल्यानगर**

अहिल्यानगर इथले निजामकालीन इतिहासाचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ पत्रकार, इतिहास संशोधक, 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे प्रेरणास्थान तथा स्नेहालयच्या 90.4 एफएम 'रेडिओ नगर'चे माजी संचालक भूषण देशमुख यांचं काल निधन झालं. ते 63 वर्षांचे होते.

अहिल्यानगरच्या इतिहासाचा खडा न् खडा अभ्यास असलेले भूषण देशमुख यांनी नगरच्या समृद्ध इतिहासाची ओळख नागरिकांना करून देण्यासाठी अनेक वर्षे 'हेरिटेज वॉक' हा उपक्रम सातत्यानं राबविला. त्यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनातून हजारो नागरिक, विद्यार्थी, संशोधक आणि इतिहासप्रेमींना नगरच्या वैभवशाली इतिहासाचं दर्शन घडलं.

**हॉकी**

जपानमध्ये सुरु असलेल्या 18 वर्षांखालील मुलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघानं यजमान जपानचा 4-1 असा पराभव उडवत तिसऱ्यांदा चषक जिंकला आहे. भारतासाठी, आशिष पूर्तीने हॅट-ट्रिक साधली, तर कर्णधार केतन कुशवाहानं दुसरा गोल केला. यजमान संघाकडून गाकू नुमाडानं एकमेव गोल केला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजांसह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**